**सरकारपक्षा तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांचा सरतपास शपथेवर सुरु**

**{ ॲड.एन.ए.ताडेवाड, सहा.सरकारी वकील }**

०२. आज रोजी सर्व आरोपी न्यायालयात हजर आहेत. फिर्याद दिल्यानंतर पोलीसांनी माझा पुरवणी जबाबसुध्दा घेतला होता. पोलीसांनी माझे मुलाचे मृत्यूनंतर त्याचे फोटो काढले होते. मी ते फोटो दाखवले तर ओळखू शकेल. मला आता दाखविण्यात आलेले फोटो तेच आहे. माझे मुलाचे तसेच चिठ्ठी ठेवलेल्या जागेचे एकुण सहा फोटो मला दाखवले ते तेच आहे. सदरचे फोटो **आर्टीकल 'ए ते एफ'** वर आहेत. मी माझे मुलाचे हस्ताक्षरातील चिठ्ठी पाहीले तर ओळखू शकेल. मला आता दाखविण्यात आलेली चिठ्ठी माझे मुलानेच लिहीली आहे. त्यातील हस्ताक्षर त्याचेच आहे. ते मी ओळखतो. सदरची चिठ्ठीतील हस्ताक्षर साक्षीदाराने मान्य केल्याने सदरची **चिठ्ठीला निशाणी क्र.४१** देण्यात येते.

**( आरोपीचे सन्मानीय विधीज्ञांनी सदर चिठ्ठीचा साक्षीदार लेखक नसल्याने व हॅंडरायटींग एक्सपर्ट अद्याप तपासला नसल्याने त्यास निशाणी ऐवजी आर्टीकल देण्याची विनंती केली व निशाणी देण्यास आक्षेप नोंदवला. परंतु सदरचा साक्षीदार हा मयत व्यक्तीचे वडील असून त्याने मयत मुलाचे हस्ताक्षर ओळखले आहे व सदरची चिठ्ठी जरी मुद्देमालात जप्त असलीतरी ती मुळ दस्त असल्याने त्यास निशाणी देण्यात आली. परंतु विधीज्ञांचा आक्षेप लक्षात घेता सदरची निशाणी ही त्याचे आक्षेपासह देण्यात आली व दोन्ही पक्षांना त्याचे पुराव्याच्या ग्राह्यतेबाबत युक्तीवादाची संधी अंतिम युक्तीवादाच्या वेळी उपलब्ध ठेवण्यात आली. )**

०३. मी माझे मुलाने फास घेतलेली दोरी ओळखू शकतो. आता मला दाखविण्यात आलेली जप्त दोरी ती नाही. साक्षीदार सांगतो की त्याने वायरच्या दो—याने फास घेतला असे म्हणत होते. त्यावेळी माझी अवस्था निट नव्हती. त्यामुळे मला नक्की सांगता येत नाही.

सरतपास पुर्ण.

**उलटतपासणी आरोपी क्रमांक १ तर्फे ॲड.पी.बी.राख**

०४. माझे गाव कामखेडा ते अर्चना हिचे गाव काठोडा या दोन्ही गावामध्ये ३० कि.मी. चे अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मयत अनिल हा माझे पहिल्या पत्नीचा मुलगा आहे. माझे दुस—या पत्नीचे मुलाचे नाव गणेश आहे. हे म्हणणे खरे आहे की मला दोनच मुले होती. हे म्हणणे खरे आहे की

मला कामखेडा येथे वडीलोपार्जीत जमीन व घर आहे. हे म्हणणे खरे आहे की मागील दोन—चार वर्षात कामखेडा येथे नवीन घर बांधले आहे. हे म्हणणे खरे आहे की माझा दुसरा मुलगा कंपनीत पुणे येथे आहे व त्याला सुध्दा पुणे येथे प्लॅट आहे. हे म्हणणे खरे आहे की माझे दोन्ही मुले उच्च शिक्षीत आहे. हे म्हणणे खरे आहे की अनिल याचे शिक्षण डि.एड झालेले होते.

०५. माझे चुलते कचरु जमदाडे व शाम शेळके रा. समनापुर यांचे मध्यस्तीने अनिलचा विवाह झाला होता. लताबाई ही माझी दुसरी पत्नी आहे. शाम शेळके हे माझी पत्नी हिचा लांबचा चुलत भाउ आहे. हे म्हणणे खरे नाही की मला कामखेडा येथे जवळपास १० ते १२ एकर जमीन होती. साक्षीदार सांगतो की मला ७ एकर जमीन होती. हे म्हणणे खरे आहे की मला गट नं. २५५ कामखेडा येथे ७ एकर जमीन होती व गट नं.२०७ मध्ये कामखेडा येथेच दिड एकर जमीन होती. हे म्हणणे खरे आहे की मला गट नं.१५३ मध्ये कामखेडा येथे ४ गुंठे जमीन होती.

०६. मला पाच बहीणी आहेत. त्यांची नावे कांता, राधा, शामल, कुसूम, चांदतारा अशी आहेत. हे म्हणणे खरे आहे की अनिल हा शिक्षक म्हणुन काम करीत होता. हे म्हणणे खरे आहे की अनिल शिकलेला असल्याने त्याची ईच्छा होती की त्याला शिकलेली बायको मिळावी. हे म्हणणे खरे आहे की माझी सुन अर्चना ही कमी शिकलेली होती. हे म्हणणे खरे नाही की ती नववीपर्यंत शिकलेली होती. साक्षीदार सांगतो की ती नववी पेक्षाही कमी शिकलेली होती आणि तिच्या भावाने खोटे शिक्षण सांगुन लग्न जमवले. हे म्हणणे खरे आहे की खोटे शिक्षण सांगितल्यामुळे अनिल हा लग्न झाल्यामुळे नाराज होता. हे म्हणणे खरे नाही की तो माझे लहाण्या मुलाकेडे पुणे येथे राहण्यासाठी गेला होता.

७. मला अनिलची पहिली मुलगी अमृता हिचा जन्म दिनांक ३१.०८. २०१२ रोजी झाला हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की अनिलचे पहिल्या मुलीचे बाळांतपण माहेरी झाले होते. हे म्हणणे खरे आहे की अनिल व अर्चना हिचा विवाह दिनांक ११.०६.२०११ रोजी एम.आय.डी.सी येथे झाला होता व ते लग्न तिचे मामानी करुन दिले होते.

८. हे म्हणणे खरे आहे की अनिलकडे अॅटो रिक्षा सुध्दा होता. साक्षीदार सांगतो की तो त्याला अर्चनाने घ्यायला लावला होता व तिचे म्हणणे होते की नौकरी करु नको रिक्षा चालव. हे म्हणणे खरे नाही की माझा मुलाला तंबाखुचे व्यसन होते. हे म्हणणे खरे नाही की माझा मुलाचा विवाह त्याचे मनाप्रमाणे झाला नव्हता व त्यामुळे तिला दारुचे व्यसन जडले होते. हे म्हणणे खरे नाही की विवाहानंतर त्याचे दारुचे व्यसन अधिकच वाढले होते. हे म्हणणे खरे आहे की अमृताच्या जन्मानंतर अनिल हा व्यसन करणार नाही असे सांगुन अर्चना हिला नांदायला सासरी कामखेडा येथे आणले होते.

**आरोपीचे विधीज्ञांचा निशाणी क्र.४२ वरील उलटतपास घेण्यास मुदतवाढीच्या अर्जानुसार उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

RENUKA MANIKRAO SATAV

Digitally signed by RENUKA MANIKRAO SATAV
Date: 2026.03.12 18:19:05 +0530

**( रेणूका मा. सातव )**

दिनांक : १२/०३/२०२६

अतिरीक्त सत्र न्यायाधीश, बीड